# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
(शिक्षण विभाग)

Landline No.0712-2567028
E-mail ID - education.nmc@gmail.com
दि. 11/01/2017
जा.क्र.3518/शि.वि. / 2017

प्रती,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा, म.न.पा. नागपूर.

**विषय : आपले शाळेतील विद्यार्थ्यांना मोजे खरेदी करण्यास्त रक्कम मंजुर करण्याबाबत व तशा आशयाच्या सुचना विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन ण्याबाबत.**

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग निर्णय क्र.डिसीटी 231/प्र.क्र.133/का.1417, दि.05.12.2016

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये बळविण्यात ये की, शासनाव्दारे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात येत आहे. जेणेकरुन लभार्थ्यांना योजनांचा पुर्णपणे लाभ मिळेल. DBT कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यास्तव विविध कल्याणकारी योजनांमधे ज्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे, त्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रक्कांच्या स्वरुपात अनुदान देण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. याच प्रकारे यापूर्वी विभागामार्फत पत्र 3466/शि.वि./2017, दि.04.01.17 अन्वये बुट खरेदीबाबतच्या सुचनात्मक परिपत्रक पाठविण्यात आलेले आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या सर्व विद्यार्थ्यांना मोजे देण्याचा र्णय घेण्यात आलेला होता. याअनुषंगाने दि.05.12.2016 ला प्राप्त झालेल्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यव्ही करुन विद्यार्थ्यांना मोजे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यास्तव आपणास खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यच्या सुचना देण्यात येत आहेत.

1. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना किंवा त्यांच्या पालकांना मुख्याध्यापक यांचेव्दारा प्रस्तुत परिपत्रक दाखवून परिपत्रकातील मार्गदर्शक तत्वांबाबत सुचना देवून सर्व विद्यार्थ्यांचे इयत्तानिहाय नावानिशी यादी तयार करुन त्यात नावासमोर विद्यार्थ्यांचा आधार कार्ड क्रमांक टाकावा. तसेच आधार कार्डसोबत लिंक केलेल्या बँक खात्याचा अकाऊंट नंबर, बँकेचे नाव, शाखा व IFSC Code टाकावा.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | आधार कार्ड क्रमांक | आधारकार्डसोबत लिंक केलेल्या बँक खात्याचा अकाऊंट नंबर | बँकेचे नाव | शाखेचे नाव | IFSC Code |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | | | |

2. प्रती विद्यार्थी रु.25/- याप्रमाणे मोजे खरेदी दर अनुदानासाठी मंजूर करण्यात येईल. याबाबतच्या सुचना विद्यार्थी / पालकांना देण्यात याव्या.
3. इयत्ता नर्सरी ते 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी जे (Socks in Grey Color with white streep on it) त्यांचे स्तरावर खरेदी करुन याबाबतचे देयक शाळेतील मुख्याध्यापक / संबंधित वर्गशिक्षक यांचेकडे सादर करावे.
4. विद्यार्थ्याव्दारा सादर केलेल्या पावती वी हनिशा व विद्यार्थ्यांनी मोजे खरेदी केल्याबाबतचे प्रमाणपत्र शाळेतील मुख्याध्यापक यांनी त्यांचे शाळेच्या लेटरपॅड पावतीसोबत पाठवावे.
5. विद्यार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान वितरीत करण्यास्तव त्यांच्या आधार कार्ड क्रमांकाशी निगडीत बँक खाते क्रमांक व पासबुकची प्रथम पानाची छायांकित प्रत प्राप्त करुन घेवून पावती व लेटरपॅडसह विभागास पाठवावी.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन विद्यार्थ्यांना मोजे पुरविण्यास्तव मार्गदर्शन करावे. संबंधित कार्यप्रणालीबाबत आपणास काही अडचण असल्यास आपले निचे शाळा निरीक्षक यांना संपर्क साधावा.

**(मा.अपर आयुक्त यांचे दि11.01.2017 चे मंजुरी अन्वये)**

**(फारुक अहमद खान)**
**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

प्रतिलिपी,
1. शाळा निरीक्षक, झोनक्र.1ते10, म.न.पा. नागपूर.